गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

# दैनिक झुंजार जनता

मुख्य संपादक : इस्माईल एस.शेख 8180068180

R.N.I. No. MAHMAR/2022/82590

* औरंगाबाद / महाराष्ट्र | वर्ष : ३ | रविवार दि .०६/१०/२०२४ | अंक १३ | पाने ४ | किमत ४ रु

।।सुविचार।।

वेळ आणि नशिबावर कधीही घमेंड करु नका कारण दोन्ही बदलण्यास वेळ लागत नाही...!

## * थोडक्यात *

------------

### मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक

: देखभालदुरुस्ती आणि विविध अभियांत्रिकी कारणासाठी मध्य आणि हार्बर रेल्वेवर आज मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.. मध्य रेल्वेच्या कल्याण ते ठाणे दरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर तर हार्बर मार्गावर पनवेल आणि वाशी दरम्यान मेगाब्लॉक घेण्यात आलाय.

==============

### ST च्या ताफ्यात लवकरच ५ हजार इलेक्ट्रिक बसेस

ST च्या ताफ्यात लवकरच ५ हजार इलेक्ट्रिक बसेस दाखल होणार आहेत.. या बसेस टप्प्याटप्प्याने येणार आहेत... यातील १०० बसेस दाखलही झाल्यात... डढ महामंडळाचे अध्यक्ष आमदार भरत गोगावले यांनी याबाबत माहिती दिलीय... तसेच महामंडळ २ हजार २०० डिझेल बसेसही खरेदी करणार आहे.. त्यामुळे प्रवाशांना अधिकाधिक चांगल्या सुविधा मिळणारेय... तर राज्यातील बस स्थानकांच्या सुधारणेसाठी ११० कोटींची निविदा देण्यात आलीय... पुढील ४ दिवसात प्रसिद्ध होईल, असं गोगावलेंनी यावेळी म्हटलंय..

==========================

### संभाजीराजेंच्या नेतृत्वात पुणे ते गेट वे ऑफ इंडिया रॅली

चला अरबी समुद्रातील शिवस्मारक शोधायला...अशी घोषणा देत संभाजीराजे छत्रपतींच्या नेतृत्वात अरबी समुद्रात शोध घेतला जाणारे... आज संभाजीराजे छत्रपतींच्या नेतृत्त्वात शिवभक्तांच्या उपस्थितीत पुण्यातून रॅली निघणार आहे.. त्यानंतर चेंबूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करण्यात येणारे असून गेट वे ऑफ इंडिया येथे ही रॅली पोहोचेल...त्यानंतर अरबी समुद्रात जावून शिवस्मारकाचा शोध घेण्यात येणार असल्याचं आयोजकांकडून सांगण्यात आलंय...

=============================

### रश्मी ठाकरे यांचा ठाणे दौरा

उद्धव ठाकरेंच्या पत्नी रश्मी ठाकरे ठाण्यातील देवीचं दर्शन घेणार आहे.. आज संध्याकाळी ४ वाजता त्या टेंभी नाक्यावरील दुर्गेश्वरी देवीचं दर्शन घेतील. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा रश्मी ठाकरे टेंभी नाक्याला जाऊन, दुर्गेश्वरी देवीचं दर्शन घेऊन आरती करतील. यावेळी शिवसेना ठाकरे गटाच्या महिला कार्यकर्त्याही मोठ्या संख्येने उपस्थित असणार आहेत. आनंद दिघे यांनी १९७८मध्ये टेंभी नाक्यावरील या नवरात्रौत्सवाची सुरुवात केली होती.


## मुंबईत एकाच कुटुंबातील ७ जणांचा होरपळून मृत्यू;

# झोपेतच मृत्यूने गाठले

मुंबई : चेंबूर येथील सिद्धार्थ कॉलनीत असलेल्या एका घराला रविवारी (ता. ०६ ऑक्टोबर) पहाटे भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या घटनेत एकाच कुटुंबातील पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. यामध्ये दोन लहान मुलांचा समावेश असून शॉर्ट सर्किटमुळे ही घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. पहाटे ४.३० ते ५.०० वाजताच्या सुमारास ही आग लागल्याचे सांगण्यात आले आहे. तर या घटनेत अन्य दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. परंतु, गाढ झोपेत असताना ही घटना घडल्याने परिसरात नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

चेंबूर येथे एक हृदयद्रावक घटना घडली आहे. सिद्धार्थ नगर येथे एका घराला भीषण आग लागली आहे. या घटनेत एकाच कुटुंबातील सात जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला आहे. आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असल्याचे बोलले जात आहे. चेंबूर येथे सिद्धार्थ नगर येथील घराला पहाटे साडेचारच्या सुमारास आग लागली होती. यावेळी घरात सर्व सदस्य होते. गुप्ता परिवारातील सर्व सदस्य असून त्यांचा होरपळून मृत्यू झाला आहे. आग लागल्यानंतर अग्नीशमन दलाला सांगण्यात आलं होतं. मात्र, अग्नीशमन दलाचे पथक येईपर्यंत आगीने रौद्ररुप धारण केले त्यातच गुप्ता कुटुंबीय गंभीर जखमी झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुप्ता परिवाराला राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले आहे. मृतांमध्ये तीन लहान मुलं आणि दोन पुरुष आणि दोन महिलांचा समावेश आहे. आग लागल्यानंतर सगळे घराबाहेर पडण्याचा प्रयत्न करत होते. मात्र आगीने रौद्ररुप धारण केले होते. त्यामुळं त्यांना घराबाहेर पडता आलं नाही. तसंच, सर्व कुटुंब साखरझोपेत असातानाच आग लागली त्यामुळं त्यांना बाहेर पडणे कठिण झाले. गुप्ता परिवार राहात असलेले घर हे दोन मजली होते. तळ मजल्याला आग लागल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किट झाल्यामुळं आग भडकली असावी. तसंच सर्वजण झोपेत असल्यामुळं उशीर झाला व आगीने रौद्ररुप धारण केले. स्थानिकांनीही आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. सध्या अग्नीशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी पोहोचल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

************





## मोहिनी माने पोलीस दलात निवड तामसा पोलिसांनी केला सत्कार

**संतोष डवरे,हदगाव :-** तालुक्यातील वायफणा येथील कुमारी माने हीची पुणे शहर पोलीस दलात खेळाडू कोट्यातून निवड झाली असून या ठिकाणी तामसा पोलीस ठाणे येथील महिला पोलिस अधिकारी कमल शिंदे यांनी निवड झाल्या बद्दल तिचा सत्कार केला तामसा येथून जवळ असलेल्या वायफणा(बु) ही मुलगी कराटे प्रशिक्षण घेत मोहिनी माने हिने आपले शिक्षण पूर्ण झाले देश सेवा करण्याची तिची जिद्द लहान पना पासून होती सैनिक व पोलीस दलात तिची आवड मोठी होती म्हणून तिने जिद्दी आणि चिकाटीच्या जोरावर सामान्य कुटुंबातून आपले शिक्षण पूर्ण केले व पुणे शहर येथील पोलीस दलात निवड झाली या निवडीचे स्वागत तामसा परीसरात होत असून गावातील वायफणा (बू) गावातील नागरिक यांनी मोहिनी माने हीचे कौतुक केले या निवडीच्या वेळी ओबीसी हदगाव हिमायतनगर तालुका अध्यक्ष नाना गुद्दत्वाड, दत्ता पाटील कवळे सरपंच येल्ली, बीट जमादार सूर्यवंशी, बीट जमादार नागरगोजे, अशोक फाळके, सटवा शिंदे, श्याम माने,गजानन




शिंदे पाटिल, सूर्यवंशी पोलीस पाटील इत्यादींची उपस्थिती होती या वेळी महिलांनी प्रत्येक क्षेत्रा मध्ये काम करावे विशेष म्हंजे आपण स्पर्धा परीक्षा द्यावा आणि देश सेवा करावी पुणे या ठिकाणी पोलीस दलात निवड झाल्या बद्दल माने हिचे निवडीचे स्वागत करून पुढील कामगिरी साठी तामसा पोलीस ठाणे येथील महिला अधिकारी कमल शिंदे यांनी कौतुक केले

## नवरात्र उत्सवानिमित्त माऊली वारकरी संस्थेत बालकीर्तन महोत्सवाचे आयोजन

### बालवारकरी विद्यार्थी करत आहे कीर्तन;साथसंगतीला देखील बालवारकरी विद्यार्थीच.

**सिल्लोड:** माऊली वारकरी गुरुकुल आश्रम अनाथालय निल्लोड फाटा येथे नवरात्र उत्सवानिमित्त संस्थेत वारकरी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी नवदिवसीय बालकीर्तन महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले असून कीर्तन देखील संस्थेत शिक्षण घेणारे विद्यार्थीच करणार आहे. दिनांक ०३ ऑक्टोबर पासून सुरू होणाऱ्या या बालकीर्तन महोत्सवात अनुक्रमे कु.जयेश महाराज बोरसे, साईनाथ महाराज विसपुते, युवराज महाराज तोडकर,प्रेम महाराज अहिरे,कृष्णा महाराज जाधव,आदित्य महाराज साळुंके,आर्यन महाराज कवळकर,दीपक महाराज भिसे आदी बालवारकरी विद्यार्थ्यांची कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. दिनांक ११ ऑक्टोबर रोजी संस्थेचे वारकरी व्यवस्थापक प्रसिद्ध पखवाज वादक,युवा किर्तनकार ह.भ.प संदीप महाराज काकडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.या कीर्तन महोत्सवासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनाथांची माऊली रामेश्वर महाराज पवार यांचे मार्गदर्शन लाभले असून कीर्तन महोत्सव यशस्वी होण्यासाठी संस्था व्यवस्थापक गजानन महाराज डीगावकर, मुख्याध्यापक कृष्णा जैवाळ,वारकरी व्यवस्थापक पुरुषोत्तम महाराज पवार, राहुल महाराज उगले,कचरू महाराज चाथे, आकाश महाराज निकम,गणेश महाराज जाधव,अकील भाई शेख, शंकर लोखंडे,सोपान साबळे, सागर तेलंग्रे, आदी प्रयत्न करीत आहे.





बालकिर्तन महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी सातवी वर्गात शिकत असलेले कु.जयेश महाराज बोरसे यांची कीर्तन सेवा संपन्न झाली.त्यांचे स्वागत करतांना बालवारकरी विदयार्थी

## स्वच्छता ही सेवा उपक्रम उत्साहात

# विद्यार्थ्यांनी घेतली स्वच्छतेची शपथ








स्वच्छता ही सेवा रॅलीचे उद्घाटन करताना संस्थापक अध्यक्ष अनाथांची माऊली रामेश्वर महाराज पवार पोलीस अधिकारी ज्ञानेश्वर पवार, मुख्याध्यापक कृष्णा जैवाळ

### स्वच्छतेचे संस्कार कित्येक पिढ्यांना उभारी देतात - रामेश्वर महाराज पवार

निरोगी आयुष्य ही खऱ्या अर्थाने सदृढ जीवनाची गुरुकिल्ली असून प्रत्येकाने स्वच्छतेला सेवेतून पाहिले पाहिजे.राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी देखील आपल्या जीवनात स्वच्छतेला महत्व दिले म्हणून त्यांची प्रेरणा घेऊन स्वच्छता हा देखील एक संस्कार आहे हा विचार प्रत्येकाने आपल्या जीवनात उतरवावा.स्वभाव आणि संस्कार या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून युवा कार्य क्रीडा मंत्रालय भारत सरकार,नेहरू युवा केंद्र ,गंगा गोदावरी संस्थेचे अध्यक्ष भारुडकार शरद काकडे यांच्या वतीने राबविण्यात आलेला उपक्रम नक्कीच कौतुकास्पद असाच म्हणावा लागेल.

सिल्लोड:राष्ट्रपिता महात्मा गांधी, माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त सिल्लोड तालुक्यातील माऊली वारकरी गुरुकुल आश्रम अनाथालय तसेच संत ज्ञानेश्वर विद्यालय निल्लोड फाटा येथे युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकार ,नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर,गंगा गोदावरी संस्था सिल्लोड यांच्या वतीने स्वच्छता ही सेवा या उपक्रमाअंतर्गत ''संस्कार स्वच्छता...स्वभाव स्वच्छता'' अभियान राबविण्यात आले.यावेळी संस्थेतील सुमारे ३०० विद्यार्थ्यानी शालेय परिसराची स्वच्छता केली.यावेळी महात्मा गांधी, लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थीत मान्यवरांच्या वतीने करण्यात आले.स्वच्छता रॅलीचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष अनाथांची माऊली रामेश्वर महाराज पवार यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पोलीस अधिकारी ज्ञानेश्वर पवार, मुख्याध्यापक कृष्णा जैवाळ, तालुका समन्वयक तेजस्विनी वानखेडे,प्रसिद्ध भारुडकार शरद काकडे,संस्था व्यवस्थापक गजानन डीगावकर, वारकरी व्यवस्थापक संदीप काकडे,पुरुषोत्तम पवार,संस्था सदस्य शारदा पवार,शिक्षक परमेश्वर बडक,समाधान काकडे,रविंद्र बडक, ममता माहोर,संजू तडवी, तृप्ती राजगुरे,सुजाता बिऱ्हाडे, रत्नाकर निकाळजे,अकील शेख,शंकर लोखंडे, दत्तू इंगळे, सागर तेलंग्रे,लिपिक अशोक मोरे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी यावेळी स्वच्छतेची शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका तृप्ती राजगुरे तर आभार ममता माहोर यांनी मानले.सदरील कार्यक्रमाला नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी संकल्प शुक्ला यांचे मार्गदर्शन लाभले.

**************

## येत्या मार्च महिन्यापर्यंत कायदेशीर रित्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ मी ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही- आमदार प्रशांत बंब
### गंगापूर तालुक्यात प्रचाराचा शुभारंभ; नऊ हजार कामगारांना संसार भांडी वाटप



**गंगापुर (हारुण पठाण):**
जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या शिक्षकांविरोधात मी आवाज उठवला त्या शिक्षकांना यांनी वैयक्तिक राजकारणासाठी पाठीशी घातले मला विद्यार्थी घडवायचा आहे. त्या उलट यांना पैसे कमवण्यासाठी शिक्षण संस्था वाचवायचे आहेत.परंतु लक्षात ठेवा माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या गोरख गोरगरीब जनतेला कोणी भूलथापा देऊन फसवेपणा करत असेल तर ते मी कदापि खपवून घेणार नाही. असा इशारा आमदार प्रशांत बंब यांनी दिला. लासुर स्टेशन येथून जवळच असलेल्या आरापूर शिवारात आज (दि. ५) शनिवार रोजी गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील पाच महत्त्वांच्या रस्त्यांची दर्जोन्नतीकरून त्यांना हायब्रीड एनुईटी मॉडेल (क्अच्) मधून सात अब्ज रुपये मंजूर करून घेऊन या रस्त्यांच्या कामाच्या भूमिपूजन व नऊ हजार कामगारांना संसार भांडे वाटप करण्यात आली त्या प्रसंगी ते बोलत होते. गंगापूर तालुक्यातील कसाबखेडा फाटा - पोटूळ -डोमेगाव ढोरेगाव रस्ता - एकुण लांबी २३ किमीसाठी १६४.८७ कोटी रुपये, देवगाव रे कायगाव टोका - एकुण लांबी ३३ किमी २२९ कोटी रुपये, माळीवाडा - आसेगाव आंबेगाव - एकलेहरा - कासोडा - आंबेलोहळ रस्ता एकुण लांबी १३ किमी ९१.४२ कोटी रुपये, काटेपिंपळगाव - वजनापूर - आंबेलोहळ - तुर्काबाद - लिंबेजळगा रस्ता एकूण लांबी १६. २० किमी. ११८.१६ कोटी रुपये तर खुलताबाद तालुक्यातील चिकलठाण - लोणी - बाजार सावंगी - खुलताबाद फुलंब्री रस्ता एकुण लांबी १४.६० किमी ९५.५७ कोटी रुपये अशा एकुण सात अब्ज रुपये खर्च करून होणाऱ्या १०० किमी रस्त्याच्या अंतराच्या कामाचे भूमिपूजन आमदार बंब यांनी केले. पुढे बोलताना आमदार बंब म्हणाले की माझ्या पंधरा वर्षाच्या काळात मी केलेली कामे माहिती पुस्तिकेच्या माध्यमातून गावागावात प्रत्येक ग्राम पंचायतला वाटप करणार आहे. परंतु तुम्ही १७ वर्षापासून मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार आहात त्या काळात तुम्ही केलेल्या कामाचा हिशोब जनतेसमोर मांडा. पदवीधरांना बरबाद केले, जिल्हा परिषद शाळा बरबाद केल्या, ज्या शिक्षकांच्या विरोधात मी आवाज उठवला त्या शिक्षकांना यांनी पाठीशी घातले आणि या माध्यमातून स्वतःच्या संस्था बळकट केल्या. एवढेच नाही तर संस्थेत कामाला लागण्यासाठी शिक्षकांकडून ५० - ७० लाख रुपये घेऊन ठेवले. परंतु त्यांना अद्याप नौकरी दिली नाही. परंतु यापुढे असे होणार नाही. कुवतीप्रमाणे मोफत नोकऱ्या मिळतील. येत्या मार्च महिन्यापर्यंत कायदेशीर रित्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ मी ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणाले. दरम्यान यावेळी नऊ हजार कामगार कल्याण संसार भांडी वाटप लाभ धारकांना करण्यात आली.
*************

## टिटवी सावळदबारा रस्त्याची चाळण, रस्त्यावर खड्डेच खड्डे; सा.बां. विभाग अपघात होण्याची वाट बघतोय का? सरपंच संध्याताई जाधव

**सोयगाव तालुका प्रतिनिधी दिलीप मोरे....**
सोयगाव तालुक्यातील टिटवी-पळसखेड ते सावळदबारा या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली असुन याचा नागरिकांना मोठा त्रास होत आहे रोजच्या या रस्त्याच्या वापरामुळे परिसरामधील लोकांना अंगदुखी व हाडांचा त्रास वाढला आहे वारंवार या अपुऱ्या राहिलेल्या

> **मागील वर्षी सावळदबारा ते टिटवी पळसखेड होत**
> असलेल्या कामाला अर्धवट सोडून ठेकेदाराने ५-६किलोमीटर काम सोडून दिले आहे हे अपूर्ण काम पूर्ण होण्याच्या मागण्या सार्वजनिक बांधकाम विभागाला करूनही ते जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे त्यांनी तात्काळ या रस्त्याचे काम पूर्ण करावे सा.बां. विभाग कशाची वाट पाहत आहे असा प्रश्न पडलाय
> - सौ संध्याताई भा.जाधव- सरपंच टिटवी,पळसखेड

रस्त्याच्या मागण्याही होत राहिल्या आहेत तरीही सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र याकडे अजिबात लक्ष




देत नाही याचा सर्वाधिक त्रास टिटवी येथील विद्यार्थ्यांना होत आहे बाहेरगावी शिक्षण घेणाऱ्या फत्तेपूर व धामणगाव बढे येथे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजचा प्रवास या रस्त्याने करावा लागतो त्यामुळे या चिमुकल्यांचा अंगदुखीचा त्रास वाढला आहे त्यामुळे
गावातील नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना अतोनात त्रास सहन करावा लागतो. रस्त्यामध्ये दोन ते तीन फुटांपर्यंतचे खड्डे पडलेले असल्याने या खड्डयामधुन रस्ता शोधणे अवघड आहे. यामुळे अनेकांना आपले शिक्षण पण सोडुन द्यावे लागले हे अत्यंत गंभीर बाब आहे. शिवाय अपघात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही टिटवी,पळसखेड ते सावळदबारा रस्त्याची अक्षरशः चाळणी होईपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग झोपा काढतोय की काय ? प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित रस्त्यांची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी व लोकप्रतिनिधींनीही याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे
***********

## उत्तम आरोग्याचे प्रवेशद्वार मौखिक आरोग्य डॉ . नितीन सरवदे




कन्नड, दि.०५ शारीरिक आरोग्य सुदृढ राखण्यासाठी आपण नियमितपणे काळजी घेतो.परंतु मौखिक तसेच दातांच्या आरोग्याकडे तितक्याशा गांभीर्याने पाहिले जात नाही. मौखिक आरोग्याच्या बाबतीत दुर्लक्ष केले जाते.परंतु उत्तम आरोग्यासाठी मौखिक आरोग्यची सुध्दा काळजी घेतली पाहिजे कारण उत्तम आरोग्याचे प्रवेशद्वार हे मौखिक आरोग्य आहे. असे प्रतिपादन ग्रामीण रुग्णालय कन्नड येथील दंत चिकित्सक डॉ. नितीन सरवदे यांनी केले. संत तुकाराम महाविद्यालय कन्नड येथील गृहविज्ञान विभागाच्या वतीने राष्ट्रीय पोषण माह निमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. मौखिक आरोग्याचे महत्त्व सांगताना ते पुढे म्हणाले की, मुखाचे आरोग्य राखणार्या सवयींचा अवलंब करताना दररोज किमान दोनवेळा ब्रश ने दांत स्वच्छ घासावेत आणि दातांच्या डॉक्टरकडे नियमितपणे जाण्याचे वेळापत्रक राखावे.मौखिक कॅन्सरचे प्रमाणे दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे तरुणांनी व्यसनापासून दूर रहावे असे आवाहन ही त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.शरद गावंडे हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी पौष्टिक पाककला स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. यामध्ये प्रथम द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ आलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. व भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी मा. आदिनाथ संगपाल हे व्यासपीठावर उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता देशमुख यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गृहविज्ञान विभाग प्रमुख डॉ.कल्पना देशमुख यांनी केले.सुत्रसंचलन डॉ. केशव मोरे यांनी केले. तर डॉ सुधीर पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
ठ********************

## एकच ध्यास विकास माझ्या मतदारसंघाचा .

**गगापुर प्रतिनिधि हारून पठान**
*मौजे ''भिसेवाडी'' येथे विविध विकास कामांसाठी कार्यसम्राट आमदारप्रारमेशपाबोरनारेसर यांनी विशेष प्रयत्न करून ''६ कोटी ६८ लाख रुपये निधी'' मंजूर करून आणलेल्या कामांचे भूमिपूजन व लोकार्पण आज आमदारप्रारमेशपाबोरनारेसर यांच्या हस्ते करण्यात आले याकार्यक्रमास शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र पा साळुंके, माजी सभापती अंकुश पा हिंगे, शहरप्रमुख पारस घाटे, युवासेना जिल्हाप्रमुख भरत पा कदम, संचालक रितेश शेठ मुनोत, संभाजी पा जगताप, तालुकाप्रमुख श्रीराम गायकवाड, तालुका समन्वय गणेश पा निकोले, शहर समन्वयक अक्षय कुलकर्णी, उपविभागप्रमुख पप्पू पा हुमे, उपतालुकाप्रमुख राहुल पा शेळके, किशोर आप्पा हरीचंद्रे, कृष्णा जोशी, वाल्मीक शेजुळ, सचिन शेलार, अनिल सोमवंशी, योगेश निघोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सरपंच वसंत नाना हुमे, सरपंच नरेंद्र बैनाडे, नवनाथ पा शिंदे, राजेंद्र संगेकर, कडूभाऊ शेजुळ, सचिन पा घोडके, रामेश्वर पा निघोटे, रावसाहेब कोतकर, बाबू मिर्झा, जयेश बनकर, बाळू काका नेटके, दीपक नेटके, गजू लेकुरवाळे, सचिन मोगल, मनोज दवंगे, ज्ञानेश्वर शेजुळ, देविदास भिसे, शिवाजी पा भिसे, तुळशीराम पा भिसे, गंगाधर पा भिसे, आत्माराम पा भिसे, चंद्रकांत पा भिसे, अशोक पा भिसे, प्रकाश पा भिसे, अनिल पा हुमे, भागिनाथ पा भिसे, ईश्वर भिसे, कृष्णा भिसे, राहुल भिसे, योगेश भिसे, शैलेश भिसे, आदिनाथ भिसे, दीपक भिसे, संदीप भिसे, वाल्मीक हुमे, कैलास भिसे, निलेश भिसे, किरण पा भिसे, संतोष भिसे, अमर पा भिसे, विवेक पा भिसे,




चेतन भिसे, गणेश भिसे, सचिन भिसे, फिरोज शेख सर, विजय मिट्टेवाड सर, अर्जुन जाधव सर, दीपक भिसे सर महिला मंडळ ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.
***********

## माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती सोमवारी एक दिवशीय लाक्षणिक संपावर-सभापती नरवडे

-----------------
**माजलगाव प्रतिनिधी (पठाण वहीदखान)**
राज्यातील सर्व बाजार समित्यांनी सोमवार दि.०७ ऑक्टोबर रोजी एक दिवशी लाक्षणिक संप पुकारला आहे या अनुषंगाने माजलगाव बाजार समिती एक दिवस संपावर जाणार आहे असे माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती जयदत्त नरवडे ,उपसभापती श्रीहरी मोरे ,सचिव हरिभाऊ सवणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न मंडळ व महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह निगडी, चिंचवड पुणे येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते या परिषदेला राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय व दोन्ही उपमुख्यमंत्री महोदय तसेच माननीय पणन मंत्री उपस्थित राहून मार्गदर्शन करणार होते परंतु राज्य मंत्रिमंडळाची बैठक असल्याने माननीय मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहू शकले नाहीत राज्याचे पणन मंत्री म्हणून श्री. अब्दुल सत्तार हे परिषदेस उपस्थित राहण्याकरिता आले व राज्यातील बाजार समितीच्या प्रतिनिधीचे कोणतेही म्हणणे अडचणी, प्रश्न न ऐकता व त्यावर उपाययोजना न करता व शासनाचे मत न



मांडता परिषदेच्या सभासदाळावरून निघून गेले त्यामुळे आपल्या प्रश्नांचा विचार केला नाही म्हणून तेव्हा लगेच सभास्थानी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांचा जाहीर निषेध करण्यात आला व दि.०७ ऑक्टोबर रोजी एक दिवशी राज्यातील सर्व बाजार समितीचे कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला याच अनुषंगाने माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती मधील सर्व बाजार घटकांनी या एक दिवसीय लाक्षणिक संपामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन सभापती जयदत्त नरवडे,उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे
*************

## वन्यजीव सप्ताह निमित्त वक्तृत्व स्पर्धा संपन्न.. शालेय विधार्थीच्या मोठा सहभाग




**नांदेड :बिलोली :(शेख फारुख अहेमद )**
बिलोली शहरातील दत्तनगर टेकळी परिसरात आज दि. ५ऑक्टोबर रोजी वन विभागाच्या वतीने १ऑक्टोबर ते ७ ऑक्टोबर पर्यत वन्यजीव सप्ताह निमित्त बिलोली येथील वन पर्यटक येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बिलोली शहरातील दत्त नगर टेकळी परिसरातील तालुका वन विभागाचा वतीने दि.१ऑक्टोबर ते ७ऑक्टोबर या काळावधीत वन जीव सप्ताह निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज दि.५ऑक्टोबर रोज शनिवार शालेय विधार्थीना वक्तृव स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या आयोजक स्पर्धत कस्तुरबा गांधी विद्यालय, आंतरभारती विद्यालय, पूज्य साने गुरुजी विद्यालयातील विधार्थी सहभाग नोंदवून वन्यजीव सप्ताह या विषयावर आपली मनोगत व्यक्त केले सदर वक्तृव स्पर्धा अनुक्रमे पटकवणाऱ्या विधार्थीयांचे सम्मानपत्र देऊन गौरव करण्यात आले. सोबत वनजीव विभाग कार्यालयच्या वेळोवेळी सहकार्य करणारे सर्प मित्र क्रांती बुद्धेवार यांच्या सत्कार करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ. साबळे मॅडम मुख्याद्यापिका कस्तूरबा विद्यालय बिलोली.प्रमुख पाहुणे कल्याण गायकवाड सर मुख्याध्यापक कुंडलवाडी यावेळी विशेष मार्गदर्शन सुधाकर माणिकरावकदम, शिवसाळ बाबुराव होडके वनरक्षक मुखेड वनपरीक्षेत्र केले. विशेष म्हणजे कार्यक्रम आयोजनासाठी वनपरीमंडळ अधिकारी शेख फरीद यांच्या सह आदी कर्मचारी परिश्रम घेतले.

## पात्रुड येथे पुतळा जाळून निषेध



**माजलगाव प्रतिनिधी (पठाण वहीदखान)**
सकल मुस्लिम समाजाच्या वतीने पत्रुड येथे हजरत पैगंबर यांच्या बद्दल अपशब्द वापरुन मुस्लिम समाजाच्या भावना दुखविण्याचे प्रकार सतत सुरू आहे. गेल्या काही दिवसापासून भारतीय जनता पार्टीचे आमदार नितेश राणे, रामगिरी महाराज काल एक मंचावर यती नरसिंहनंद यांनी पैगंबर मोहम्मद यांच्या बद्दल आक्षेपार्ह भाषेचा वापर केलेला आहे. त्यांच्याविरुद्ध प्रशासनाने कठोर कारवाई करावी याकरिता शुक्रवारी सकल मुस्लिम समाजातर्फे पात्रुड येथे नितेश राणे रामगिरी महाराज नरसिंहनंद यांचा पुतळा जाळून निषेध करण्यात आला. यावेळी प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी. यावेळी एम आय एम चे जिल्हा उपाध्यक्ष युसूफ शेख, हाफीज शफीक, हाफीज रफिक इरफान शाह मुन्ना कुरेशी अझहर कुरेशी असेफ शेख वो मोठ्या संख्येने मुस्लिम समाजाचे तरुण उपस्थित होते.


## पाटोदा शाळेत आनंददायी शनिवार विद्यार्थ्यांनी लूटला मनमुराद आनंद

**संतोष डवरे,परभणी :**- सेलू परिसरातील पाटोदा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दरशनिवारप्रमाणे दि.५ ऑक्टोबर रोजीही आनंददायी शनिवार म्हणजेच 'बिनादप्तराची शाळा' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला. इयत्ता पहिलीचे वर्गशिक्षक श्री वानोळे सरांनी मुलांना आनंद मिळवा म्हणून विविध विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. तालबद्ध व्यायाम प्रकारामध्ये 'फुग्यांची कवायत' घेताना मुलांनी अत्युच्च आनंद घेतला. विद्यार्थी सुरक्षा व काळजी अंतर्गत 'गुड टच आणि बॅड टच' बद्दल प्रात्यक्षिकासह माहिती दिली. विविध विषयावर विद्यार्थ्यांनी 'अभिनय' करून दाखविताना विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला. कार्य जगताची ओळख या उपक्रमांतर्गत 'वृत्तपत्राची ओळख' विद्यार्थ्यांना करून दिली. प्राण्यांच्या चित्राला डोळ्यावर पट्टी बांधून शेपटी काढताना मुलांच्या हसण्याला सीमा राहिली नव्हती. फुगे फुगवण्याचा सुखद अनुभवही विद्यार्थ्यांनी आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत उपभोगला. मुख्याध्यापक श्री तोटेवाड, श्रीम.अनुजा पाटील, श्रीम. गीता बरसाले यांनीही उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला. गटशिक्षणाधिकारी श्री विपूल भागवत, केंद्रप्रमुख श्री देविदास चव्हाण, मुख्याध्यापक श्री संतोष तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पालकांच्या सहकार्याने शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा मानस आणि प्रयत्न असल्याचे पहिलीचे वर्गशिक्षक श्री वानोळे यांनी सांगितले.
************



# “जागर देवीचा” सुधागड किल्ल्यावर विराजमान ‘श्री भोराई देवी’

## नवरात्रोत्सवात भाविकांची प्रचंड गर्दी


पाली, सुधागड किल्ला.



पाली, सुधागड किल्ल्यावरील श्री भोराई देवीचे मंदिर.


पाली, सुधागड किल्ल्यावर विराजमान झालेली श्री भोराई देवी.

### दर्शनासह निसर्ग आणि ऐतिहासिक पर्यटनाचा आनंद

**देवीच्या दर्शनासाठी किल्ल्यावर येणारे भाविक आजुबाजूचा गर्द झाडीने नटलेला मनोहारी परिसर, वाहते धबधबे, नद्या, डोगररांगा, थंड हवा यांचाही आनंद लुटत असतात. शिवाय किल्ल्यावरील विविध ऐतिहासिक वस्तूंना भेट देतात. त्यामुळे त्यांना तिहेरी आंनद मिळतो.**

**सुधागड पाली**

छत्रपती शिवरायांचे पदस्पर्श लाभलेल्या प्रसिद्ध ऐतिहासिक सुधागड किल्ल्यावर विराजमान असलेली श्री भोराई देवी ही सुधागड तालुक्यासह महाराष्ट्रातील अनेकांचे श्रद्धस्थान आहे. अश्विन नवरात्रात देवीच्या दर्शनासाठी किल्ल्यावर असंख्य भाविक येतात. श्रावणात देखील देवीच्या दर्शनाला काही प्रमाणात भाविक येतात. नवरात्रात येथे भाविकांची उदंड गर्दी पहायला मिळते. त्यांच्या उत्साहाला उधाण येते. गुरुवार (ता.३) घटस्थापनेपासून पासून देवीच्या दर्शनासाठी सुधागड किल्ल्यावर सध्या मोठ्या प्रमाणात भाविक येत आहेत. त्यामुळे येथील परिसर भक्तिमय व उत्साही झाला आहे.

आजही श्री भोराई देवस्थान मंडळाचे विश्वस्त गडावर नवरात्र उत्सव पूर्वापार पद्धतीने साजरा करण्याचा प्रयत्न करत आहेत. नवरात्रोत्सवात मंदिरात सकाळी पूजा, अभिषेक, सायंकाळी आरती, रात्री किर्तन असा कार्यक्रम असतो. अष्टमीच्या दिवशी गडकर्यांना मानाप्रमाणे नारळ व मानाचे विडे दिले जातात. शिलंगणाचे दिवशी पालखी निघते. नवरात्रात हजारो भाविकांना प्रसादाचा लाभ दिला जातो. सुधागड किल्ल्यावर प्राचीन काळातील श्री भोराई देवीचे मंदिर आहे. या देवीची स्थापना भृगु ऋषींनी केलेली आहे. म्हणून या देवीला ‘भृगूअंबा, भोरांबा, भोराई’ अशीही नावे आहेत. देवीची मूर्ती ३ फुट उंचीची आहे. मूळ चंडीकेचे स्वरुप असणारी श्री भोराई चतुर्भुज असून हातात त्रिशूळ, खङग-खेटक आणि दोन हातात आसूड आहे. श्री भोराईदेवीच्या पुरातन मंदिराची भोरच्या पंतसचिवांनी पुनर्बांधणी केली व याच देवीला त्यांनी आपली कुलदेवता/कुलस्वामिनी म्हणून मानले. पंतसचिव चिमणाजी रघुनाथ उर्फ नानासाहेबांनी पुत्रप्राप्ती झाल्यानंतर येथे १० दिवसांच्या आश्विन नवरात्र उत्सवास सुरुवात झाली. त्याकाळात उत्सव साजरा करण्याची जबाबदारी तालुक्याचे मामलेदार यांच्यावर होती.

************

# सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचा अनोखा उपक्रम

## गणेशोत्सव काळात जमलेले शालेय साहित्य विद्यार्थ्यांना वाटप

**पेण**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील सलग पाचव्या वर्षी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान पेण शाखेने नुकत्याच झालेल्या गणेशोत्सव काळात गणेश भक्तांनी बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी येताना कोणत्याही प्रकारचे हार, नारळ, पेढे, मिठाई, फळे न आणता त्याच पैशात विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असे शालेय साहित्य आणण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनाला उत्फुर्त प्रतिसाद देत अनेक गणेशभक्तांनी वह्या,पुस्तके,खोडरबर,शॉपनर, पेन,पेन्सिल यांसारखे शालेय साहित्य आणले होते, ते साहित्य एकत्र करून आज सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या मावळ्यांनी पेण तालुक्यातील तरणखोप येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील १२८ विद्यार्थ्यांना हे शालेय साहित्य वाटप केले. यावेळी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे राज्य कार्याध्यक्ष समीर म्हात्रे, माजी तालुका अध्यक्ष रोशन टेमघरे, शाळेच्या मुख्याध्यापिका निता पाटील, शालेय शिक्षण समिति सदस्य विनोद पाटील शाळेतील यांसह शिक्षक आणि विद्यार्थी, सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे मावळे मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणेशोत्सव काळात बाप्पाचे दर्शन घ्यायला आल्यानंतर जे पदार्थ किंवा फळे आणली जातात ते सर्वच खाल्ले जातात असे नाही किंवा खाऊन लगेच संपवले जातात,त्यापेक्षा त्याच पैशात गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असे शालेय साहित्य आणण्याचे आवाहन कार्याध्यक्ष समीर म्हात्रे यांनी केले होते. आज


विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करताना सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे पदाधिकारी.(छाया:प्रशांत पोतदार)

हे शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना समीर म्हात्रे यांनी आम्ही विद्यार्थ्यांना ज्या उद्देशाने हे साहित्य वाटप केले आहे तो उद्देश ते नक्की पूर्ण करतील आणि आम्ही दिलेल्या शालेय साहित्याचा पुरेपूर वापर करून चांगले शिक्षण घेऊन आपल्या शाळेचे, शिक्षकांचे आणि पालकांचे नाव उज्वल करून भविष्यात उच्च शिक्षण घेऊन देशाचे नेतृत्व करतील अशी आशा व्यक्त केली, तर शाळेच्या मुख्याध्यापिका निता पाटील यांनी देखील नवरात्रोत्सवात सरस्वती पुजना बरोबरच शालेय साहित्य म्हणजेच सरस्वतीचे वाटप करून आमच्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची नवी ओढ निर्माण केली आहे आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजां बाबत म्हणजेच ऐतिहासिक प्रश्नावली विचारून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी स्फूर्ती निर्माण केली याबाबत सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे आभार मानले.

*************

# फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या लोगोचे अनावरण

**पेण**

पेण धामणी येथील राजेंद्रनाथ जोशी यांच्या फायनेस्टटेक्नो फॅब या कंपनीच्या नवीन लोगोचे अनावरण घटस्थापनेच्या मुहूर्तावर राजेंद्रनाथ जोशी यांची कन्या कु.स्वरा सपना राजेंद्रनाथ जोशी हिच्या हस्ते नुकतेच फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या कार्यालयात झाले. पेण आंबेगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत धामणी येथे २०२१ पासून राजेंद्रनाथ जोशी यांनी स्वतःची फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीची मुहूर्तमेढ रोवली. तेव्हापासून आपल्या कंपनीतून त्यांनी अनेकांची स्वप्ने पुर्ण करुन आपली कंपनी कार्यरत ठेवली. आज घटस्थापनेच्या मुहूर्तावर फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या लोगोचे अनावरण स्त्री शक्तीचा आदर करत आपल्या लेकीच्या हस्ते केले. यावेळी राजेंद्रनाथ जोशी त्यांची अर्धांगिनी सपना जोशी हे उभय पती-पत्नी हजर होते. फायनेस्टटेक्नो फॅबचा लोगो कमर्शिअल आर्टिस्ट योगेश निखारे यांनी बनविला असून, सदरच्या लोगोमध्ये फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या कलात्मक क्रांती घडविण्यासाठी मशाल स्वरुपातून लोगोची मांडणी केली आहे.


फायनेस्टटेक्नो फॅब कंपनीच्या लोगोचे अनावरण करताना. (छाया: प्रशांत पोतदार)

# खोपोली खालापूर संघर्ष समितीच्या सातत्य पूर्ण पाठपुरावा यशस्वी..

## शिळफाटा पेण रोड संदर्भात कामाला पुन्हा एकदा सुरुवात ..

**खोपोली.**

खोपोली खालापूर संघर्ष समिती शहरातील प्रश्न सातत्याने आखणीपूर्वक मांडत आहेत.संबंधित प्रशासनाची भूमिका समजून घेऊन योग्य प्रकारे पत्रव्यवहार करून तज्ञ मंडळींच्या मार्गदर्शनातून शहरातील प्रश्नावर देत असलेल्या लढ्यामुळे संपूर्ण शहरात एक आशादायक वातावरण निर्माण झालेले आहे.पेण खोपोली रोड संदर्भात वारंवार पाठपुरावा करून असलेल्या अनेक अडचणीवर मात करीत अखेर या रोडचे पुन्हा एकदा काम सुरू झालेले आहे.या बाबतीत समितीने जिल्हाधिकारी व संबंधितांना पत्राद्वारे पाठपुरावा करून हा प्रश्न न सोडवल्यास आंदोलनाची भूमिका घेतली होती. ही भूमिका समजून घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत या रस्त्यावर असलेले अतिक्रमण हटवण्यास अखेर दिनांक २ ऑक्टोबर २०२४ पासून सुरुवात झालेली आहे. सार्वजनिक विभागाकडून सदर आंदोलन न करण्याची विनंती केली असून काम सुरू केल्याचेही कळविले



**राष्ट्रीय महामार्ग उपविभाग सार्वजनिक बांधकाम,पेण यांचे समितीने मानले आभार...**

असून लवकरात लवकर हा का मार्गी लागेल असेही सांगण्यात आलेले आहे. उच्च विभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, पेण यांनी पत्राद्वारे कळवल्याने समितीने सदर काम सुरू केल्याबद्दल त्यांचे आभार मानताना भविष्यात चांगल्या प्रकारचा रस्ता व्हावा व त्रस्त नागरिकांचा प्रश्न मार्गी लावा असे सूचित करताना कामात दिरंगाई केल्यास पुन्हा एकदा या संदर्भात आवाज उठवला जाईल असेही सांगितले आहे. खोपोली खालापूर संघर्ष समितीच्या वतीने नागरिकांच्या प्रश्नासाठी दिलेल्या लढ्याला यश येत असल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# खाडीपट्ट्यामध्ये इंटरनॅशनल स्कूलची मुहूर्तमेढ रोवली पदवीधर माजी विद्यार्थी शिक्षक पालक संस्थेने चिंभावेत केले भूमिपूजन

## प्राचार्य खैंरे सरांनी उचललेले यशस्वितीचे पाऊल माजी आमदार डॉ. जगन्नाथ शिंदे यांचे प्रतिपादन

**महाड :**

महाड तालुक्यातील चिंभावे बौद्धवाडी येथे सीबीएसई बोर्डचे नर्सरी ते बारावी आर्ट्स, कॉमर्स व सायन्स आणि आयटी विभाग वस्तीगृह इमारतीचा तसेच नियोजित शाळेचा शुभारंभ भूमिपूजन व शाळेच्या नियोजित इमारतीच्या फलकाचे अनावरण माजी आमदार तथा ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट अध्यक्ष डॉ. जगन्नाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यावेळी त्यांनी पदवीधर माजी विद्यार्थी शिक्षक पालक संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुधाकर खैरे सरांनी उचललेले हे पाऊल यशस्वी होणारच असे उपस्थितांसमोर प्रतिपादन केले. चिंभावे येथील सुपुत्र पदवीधर माजी विद्यार्थी शिक्षक पालक संस्था कल्याण मुंबई या संस्थेचे अध्यक्ष तसेच माजी प्राचार्य सुधाकर खैरे सर यांनी रविवारी चिंभावे बौद्धवाडी येथे स्वतः च्या मालकीची अडीच एकर जमीन नियोजित शाळेकरिता देणगी देऊन सदर वस्तीगृह इमारतीचा नियोजित शाळेचा शुभारंभ व शाळेच्या नियोजित इमारतीच्या फलकाचे अनावरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा केला. यावेळी या सोहळ्यासाठी ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट महाड तालुका अध्यक्ष मोहन शेठ, कार्यक्रमाचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्यासह पदवीधर माजी विद्यार्थी शिक्षक पालक संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळ सदस्य, ग्रामपंचायत चिंभावे मोहल्ला सरपंच शबाना ठोकण, सदस्य संदीप जाधव, माजी सरपंच अरिफ उबारे,चिंभावे ग्राम पं. माजी सरपंच जयवंत दळवी, चिंभावे बौद्धवाडी अध्यक्ष नरेश साळवी, विजय खैरे, दीपक साळवी, किशोर खैरे, लहू काणेकर, चिंभावे हायस्कूल मुख्याध्यापक अमृत तायडे आदी मान्यवरांसह पदवीधर माजी विद्यार्थी शिक्षक पालक संस्था कल्याण संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जगन्नाथ शिंदे यांनी आपल्या भाषणामध्ये ग्रामीण भागामध्ये इंटरनॅशनल स्कूलच्या निर्मितीसाठी शुभेच्छा देऊन पाच लाखाची देणगी देण्याचे कबूल करून प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाल्यानंतर देखील अधून मधून देणगी देत राहीन असे आश्वासित केले. तर संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच खैरे सरांचे अनेक मित्र परिवार यावेळी उपस्थित राहून सरांच्या या शैक्षणिक कार्यासाठी आम्ही सुद्धा सहकार्य करू असे सांगितले. दरम्यान, प्राचार्य सुधाकर खैरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सरकारी सर्व परवानग्या काढून प्रत्यक्षात जानेवारी २०२६ पासून या शैक्षणिक संकुलाच्या उभारणीला प्रारंभ होईल. सुमारे २० कोटीचा हा प्रोजेक्ट असून अनेक दानशूर माझ्या संपर्कात आहेत. सर्वांच्या सहकार्याने सदर इंटरनॅशनल स्कूल पूर्णत्वाला जाईल. यावेळी चिंभावेसह पंचक्रोशीतील अनेक नागरिक उपस्थित राहून प्राचार्य सुधाकर खैरे यांना शुभेच्छा दिल्या.



दैनिक झुंजार जनता

४ रविवार दि .०६/१०/२०२४





# सर्वपित्री अमावस्येला महा. अंनिसचा अनोखा उपक्रम

## अनाथ आश्रमातील मुलांना त्यांच्या आवडीचा खाऊ मॅजिक शोचे आयोजन



पाली, चटपटीत खाण्याचा आनंद घेताना अनाथ आश्रमातील मुले.





पाली, गाण्याचा आनंद घेतांना अनाथ आश्रमातील मुले.




पाली, मॅजिक शोचा आनंद घेतांना अनाथ आश्रमातील मुले.

**पाली,** सर्वपित्री अमावस्या या दिवशी आपल्या दिवंगत पितरांचे स्मरण केले जाते. कावळ्याला नैवेद्य दाखवून त्याच्या माध्यमातून पूर्वजांप्रती कृतज्ञता दाखवली जाते. सर्वपित्री अमावस्येचे हे मर्म समजून घेऊन, कावळ्याला नैवेद्य दाखवण्याच्या प्रथेला कालसुसंगत व समाजोपयोगी पर्याय सुचवला जावा या अनुषंगाने त्या दिवशी चाइल्ड हॅवेन, सावरसई या अनाथ आश्रमातील मुलांना त्यांच्या आवडीचा खाऊ बुधवारी (ता.२) महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती शाखा पेण यांनी वाटला. यावेळी मॅजिक शोचे आयोजन देखील करण्यात आले होते. या अनाथ आश्रमातील मुले पेण शहरातील वेगवेगळ्या शाळेत शिकायला येतात. दुपारच्या सुट्टी नंतर किंवा शाळा सुटल्यावर इतर मुलं पाणीपुरीच्या गाडीवर किंवा इतर खाऊ खात असतात परंतु या मुलांकडे पैसे नसल्यामुळे ते हे खाऊ खाऊ शकत नव्हते. मग महा. अंनिसने पाणीपुरीची गाडी ( चाट पदार्थांची गाडी ) अनाथ आश्रम हॉस्टेल वर उपलब्ध केली. आणि मुलांचा आनंद गगनात मावेनासा झाला. सदर उपक्रमास नितीन निकम, राजरत्न लोखंडे , आणि मारुती गायकवाड यांनी आर्थिक मदत केली फोटो ओळ, पाली, चटपटीत खाण्याचा आनंद घेताना अनाथ आश्रमातील मुले.

. कार्यक्रम स्थळी अं नि स चे कार्यकर्ते श्री. पोरे, एन जे पाटील, संदेश गायकवाड, नंदकिशोर परब, आदेश पाटील, हेमंत पाटील, डॉ. सुजाता निकम, व सावनी गोडबोले असे सर्व उपस्थित होते. अनेकदा मुलांना गोडधोड जेवण दिले जाते. पण चटकदार चमचमीत खाण्याची त्यांची इच्छा या निमित्ताने पुरी झाली असे होस्टेलचे व्यवस्थापक प्रकाश भाऊ यांनी आवर्जून सांगितलं.

*************

### मॅजिक शोचे आयोजन

मुलांच्या मनोरंजनासाठी मॅजिक शो चे आयोजन करण्यात आले होते. मॅजीशीयन साहिल गायकवाड यांनी वेगवेगळे जादूचे प्रयोग दाखवून मुलांना चांगलच खिळऊन ठेवल. ते जगदशी डंगर याने गाण्याच्या माध्यमातून मनोरंजन केले.

# रावसाहेब खेवरे यांनी विधान सभा लढवावी

**राहुरी /**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब खेवरे यांनी विधान (सभा निवडणूक लढविल्यास राहुरी मतदारसंघात चुरस निर्माण होणार असून त्यांच्या उमेदवारीने कोणाला फायदा व कोणाला फटका बसेल हे येणारा काळच ठरवेल. यामुळे रावसाहेब खेवरे यांच्या निर्णयाकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे .

उद्धव ठाकरे शिवसेना गटाला उमेदवारी मिळावी रावसाहेब खेवरे यांनी उमेदवारी करावी आणि कामाचा माणूस काय असतो हे मतदारसंघात दाखवून द्यावे आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी सत्ता भोगली त्यांनी मतदाराची दिशाभूल केली खेवरे यांच्याकडे कुठलीही सत्ताधारी नसताना जनता कामे घेऊन जातात ते रात्रंदिवस जनतेचे काम मार्गी लावण्यासाठी सदैव पुढाकार घेत असतात अनेकांचे प्रापंचिक असतील सुख दुःखाचे कामे असतील खेवरे यांनी कुठेही या कामासाठी जनतेला भुलवत ठेवले नाही असा उमलत्या नेतृत्वाला आता आमदार करण्याची खरी गरज आहे त्यामुळे कुठलेही निवडणुकीतून माघार घेऊ नये निवडणूक लढवावी जनता त्यांच्या पाठीशी आहे असे राहुल बाचकर यांनी म्हटले आहे. तालुकाप्रमुख सचिन म्हसे व प्रशांत शिंदे यांनी शिवसैनिकांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमच्या व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष रावसाहेब खेवरे, राहुरी तालुका अध्यक्ष सचिन म्हसे व शिवसेनेचे जिल्हा समन्वयक प्रशांत शिंदे यांनी शिवसैनिकांना मार्गदर्शन केले व हमीद पटेल भानुदास तमनर आप्पासाहेब तमनर बाळासाहेब तमनर भाऊसाहेब तमनर राहुल बाचकर राजू तमनर कौशबापू तमनर लहानु बाचकर अशोक खेवरे सतीश माने वसंत कोकाटे अमोल पवार चंद्रकांत बोर्डे नामदेव शिरसाठ आदिनाथ कोकाटे राधेश्याम परदेशी शरद कोकाटे रमेश कोकाटे राजेंद्र शिरसाट अमोल बोर्डे गणेश खेवरे संकेत खेवरे ओंकार खेवरे अजय कोकाटे ऋतू कलापुरे राजेंद्र शिरसाट विकी बोर्डे बापू शिरसाट रवी बोर्डे वसंत भुसावळ दिलीप कोकाटे अशोक शिरसाट मधुकर कोकाटे बबन अत्तार अशोक पेंढारे राहुल मोरे संजय शिरसाट सतीश माने हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील बोर्डे यांनी केले तर आभार पोपट शिरसाठ यांनी मांडले

# सबॉर्डीनेट इंजिनिअर्स असोशिएशनतर्फे निषेध आंदोलन , कोळपे मृत्यूप्रकरणी अलिबागमध्ये




**अलिबाग** । नांदेड येथे महावितरणमधील अभियंता सचिन कोळपे यांचा वरीष्ठ अधिकार्यांच्या जाचामुळे कार्यालयातच तीव्र हृदयविकाराच्या झटयाने निधन झाले. अलिबाग महावितरणच्या सबॉर्डीनेट इंजिनिअर्स असोशिएशनतर्फे अलिबाग कार्यालयासमोर कोळपे यांच्या मृत्यूस कारणीभूत असणार्या वरिष्ठ अधिकार्यांचा जाहीर निषेध केला. महावितरण विभागात गेली अनेक वर्ष विविध रिक्त पदे आहेत. शासनातर्फे पदे भरली जात नसल्याने त्याचा अतिरिक्त भार हा कार्यरत असणार्या अभियंता यांच्यावर टाकला जातो. त्यातच वरिष्ठ अधिकारी हे नाहक त्रास देत असल्याने अभियंता हे तणावात काम करीत आहेत. नांदेड येथील कार्यालया अंतर्गत हिंगोली येथे अभियंता सचिनकोळपे हे कार्यरत होते. कोळपे यांच्याकडेही अतिरिक्त कामाचा भार होता. १ ऑटोंबर २०२४ रोजी नांदेडचे मुख्य अभियंता डोये यांनी ऑनलाइन स्वरूपात मीटिंग घेतली होती. या मीटिंगमध्ये कोळपे यांना अर्वाच्य भाषेत बोलून कारवाई करण्याची धमकी दिली. वरिष्ठांच्या या वागण्याचा कोळपे याना त्रास होऊन खुर्चीतच हृदय विकाराचा तीव्र झटका येऊन खाली कोसळले. त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालय हिंगोली येथे हजर केल्यानंतर डॉटरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. महावितरणच्या प्रशासनातर्फे कर्मचार्यांची रिक्त पदे न भरल्यामुळे उर्वरित कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कामाचाताण वाढला आहे. त्यातच १०० टक्के कामाची अपेक्षा केली जाते. याच प्रकाराला कोळपे बळी पडले आहेत. अलिबाग विभागातर्फे सर्व अभियंत्यांनी या घटनेचा जाहीर निषेध केला व राज्यव्यपी आंदोलन करणार असल्याचे म्हटले आहे.

*****************

# खोपोली नगरपालिका हद्दीतील सुभाष नगर संरक्षण भिंत साठी निधी मंजूर



**खोपोली / :-** सुभाषनगर काजूवाडी येथील धोकादायक दरडीभोवती संरक्षण भिंत उभारण्यात यावी, यासाठी मागील ३-४ वर्षापासून जेष्ठ पत्रकार कै. हनुमंत ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली रायगड संघर्ष समिती, पोलीस मित्र संघटना व माजी नगरसेवक मंगेश दळवी सातत्याने पाठपुरावा करीत होते. मुख्यमंत्री कार्यालयासह खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, तहसिलदार, खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी आदी विविध ठिकाणी निवेदन देण्यात आले होते. ऐवढेच नव्हे तर अनेक वेळा आंदोलन, उपोषण, रैली, बैठका, झाल्या होत्या. अखेर या लढ्याला यश मिळाले असून सुभाषनगर व काजूवाडी संरक्षण भिंतीसाठी ३ कोटी ५० लाख रुपये निधी मंजूर झाला असून लवकरच कामाला सुरूवात होणार आहे, अशी माहिती मा. नगरसेवक मंगेश दळवी यांनी दिली. याबाबत बोलतांना खोपोली नगर परिषदेचे माजी नगरसेवक व गटनेते मंगेश दळवी म्हणाले की, सुभाषनगर लगत असलेल्या धोकादायक दरडीभोवती संरक्षक भिंत बांधण्यासाठी केंद्र सरकारकडून निधी मंजूर झाला आहे, ही खरंच आनंदाची बाब आहे. या कामासाठी ३ कोटी ५० लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती कर्जत-खालापूर विधानसभेचे आ. महेंद्र थोरवे यांनी फोन करून दिली.

***************

# संतप्त शिक्षकांचे आझाद मैदानावर अर्धनग्न आंदोलन सरकारच्या नावाने बोंबा

**सुधागड-**

शिक्षक समन्वय संघाच्या वतीने १६ ऑगस्ट २०२४ पासून आझाद मैदान मुंबई येथे शिक्षकांच्या प्रमुख मागण्यांसाठी हुंकार आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून भर ऊन व पावसात हजारो शिक्षक आझाद मैदानात तग धरून बसले होते. गुरुवारी (ता.३) संतप्त शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी अर्धनग्न आंदोलन केले. यावेळी सरकारच्या नावाने बोंबा देखील मारण्यात आल्या. या आंदोलनात हजारोंच्या संख्येने शिक्षक येथे उपस्थित होते. या सर्व न्याय मागण्यासाठी आझाद मैदान मुंबई येथे शिक्षक समन्वय संघ महाराष्ट्र राज्य तथा विना अनुदानित कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आंदोलन चालू आहे त्या आंदोलनाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने शुक्रवारी (ता.२७) घेतलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सर्व मागण्या मान्य करून शासन निर्णय काढला जाईल असे शासनाच्या वतीने आश्वासन दिले. मात्र सरकार वेळकाढूपणा करत आहे. असे आंदोलनकर्त्या शिक्षकांचे म्हणणे आहे. नुकतीच मंत्रिमंडळाची कॅबिनेट बैठक झाली मात्र त्या कॅबिनेट बैठकीत अंशतः अनुदानित शिक्षकांच्या अनुदानाचा विषय घेतला नाही. या शासनाच्या वेळकाढूपणामुळे आझाद मैदानात सनदशीर मार्गाने आंदोलन करत असलेल्या शिक्षकांच्या पदरी निराशा आली. मात्र आता सरकारने समन्वय संघावर वेगळा विचार करण्याची वेळ आणू नका, हा समन्वय संघाच्या वतीने सूचनावजा इशारा देण्यात आला आहे.

**या आहेत शिक्षकांच्या मागण्या**

**१)सर्व प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांना वाढीव प्रचलित नियमानुसार शंभर टक्के अनुदान मिळावे.**

**२ ) शासन निर्णय दिनांक १२ ,१५ ,व २४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्रुटी पूर्तता केलेल्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्ग व तुकड्या यांना समान टप्प्याने वाढीव अनुदान देणे.**

**३) राज्यातील पुणे स्तरावरील अघोषित शाळांना अनुदानास पात्र करून अनुदान मंजूर करणे.**

**४) १५ मार्च २०२४ चा जाचक संचमान्यतेचा आदेश रद्द करणे.**

**५) सर्व अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करणे.**

**६) होऊ घातलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये वाढीव अनुदानाचा आदेश काढतेवेळी सर्व कर्मचाऱ्यांचा आचारसंहितेपूर्वी एका महिन्याचा पगार व्हावा यासाठी निधीची तरतूद करणे.**










, पाली, आझाद मैदानावर अर्धनग्न होऊन आंदोलन करताना शिक्षक.

# आंबेडकरी चळवळीचे नेते सुरेशदादा गायकवाड यांना

## काँग्रेसकडून देगलूर विधानसभेची उमेदवारी देण्याची मागणी

**देगलूर**/बिलोली या दोन तालुक्यातील भारतीय संविधानातील मुलतत्वांवर काम करणारी सर्व जाती तरुणांची संघटना प्रजाराष्ट्र मोर्चा या संघटनेचे १५० गावात सुजान, अभ्यासू तरुणांचे संघटन असून देशातील संविधान विरोधी, आरक्षण विरोधी भाजपाप्रणित महायुतीला सत्तेतून बाहेर काढण्यासाठी प्रजाराष्ट्र मोर्चा ही संघटना गेल्या अनेक दिवसांपासून काम करत असून यापूर्वी रावसाहेब अंतापूरकर व जितेश अंतापूरकर यांना पाठिंबा दिला आणि भाजपाला जिंकू न देता काँग्रेसचा उमेदवार निवडून आला आहे. याकरिता यावेळी अनुजाती, बहुजन समाजातील अभ्यासू नेता सुरेशदादा गायकवाड यांना काँग्रेस पक्षाने उमेदवारी द्यावी आणि संविधान विरोधी, आरक्षण विरोधी भाजपाप्रणित महायुतीला बाहेर ठेवण्याकरिता त्याच तोडीचा तगडा जिंकण्यासारखा उमेदवार मतदारसंघात दुसरा नाही, म्हणून सुरेशदादा गायकवाड यांना देगलूर विधानसभेची उमेदवारी द्यावी, अशी मागणी प्रजा राष्ट्र मोर्चा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गौतम भालेराव काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे एका निवेदनाद्वारी केली आहे. संविधान बचावासाठी आयुष्यभर काम केलेल्या सुरेशदादा गायकवाड यांना उमेदवारी दिल्यास एससी, एसटी, ओबीसी प्रवर्गातील खूप मोठा जनसमूह काँग्रेस पक्षाला जोडून उमेदवार निवडून येण्यासोबतच नांदेडचे खासदार स्वर्गीय वसंतराव चव्हाण यांनी पूर्ण मराठवाड्यात पक्षाला फायदा होईल, असे सांगितले होते. देगलूर विधानसभेतील



एससी, एसटी, ओबीसी तरूणांनी सुरेशदादा गायकवाड यांना संविधान बाचाव करिता निवडणूक लढवण्याची विनंती केली. त्यानुसार सुरेशदादा गायकवाड निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे काँग्रेस पक्षाने संविधानाचे विभाजन टाळून जिंकून येणार्या उमेदवारांना तिकीट दिल्यास नक्कीच विजय आपलाच आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर प्रजाराष्ट्र मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष गौतम भालेराव, राष्ट्रीय अध्यक्ष कुणाल लोहगावकर, उपाध्यक्ष बबलूभाई शेख, सचिव मारोती कांबळे यांच्या स्वाक्षर्या आहेत.

************

# तांबाटी ग्रामपंचायतीला आय.एस.ओ. मानांकन

**अलिबाग,(प्रतिनिधी)**

:खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांना शुक्रवारी (दि.४) आयएसओ मानांकन प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे तांबाटी ग्रामपंचायत ही आयएसओ मानांकन मिळविणारी खालापूर तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे. शासन व्यवहारात पारदर्शकता तसेच गतिमानता यावी यासाठी ई-गव्हर्नन्सचा वापर केला जात आहे. ग्रामपंचायतीमधील विविध रजिस्टर्स,फॉर्मस, दस्ताऐवजांचे संगणकीकरण करून पेपरलेस ग्रामपंचायतींकडे वाटचाल सुरू आहे. बदलत्या परिस्थितीत ग्रामपंचायतींची कार्यपद्धतीचे पुर्विलोकन करून व्यवसाय प्रक्रिया पुनर्निर्मिती करण्याची गरज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रशासकीय कामकाज कार्यक्षम व्हावे आणि कार्यपद्धतीत गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आयएसओ प्रमाणिकीकरण करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना आयएसओ मानांकन मिळावे, यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायत कार्यालयाचे सुशोभीकरण, ग्रामपंचायतींचे रेकॉर्ड अद्ययावत ठेवणे, स्वच्छतागृहे बांधणे, गावात साफसफाई असणे, गावात व्यायमशाळा, स्वच्छ पाणीपुरवठा करणे, घरपट्टी पाणीपट्टी वसुली, ग्रामसभांत नियमित विषयांवर चर्चा, गावात वृक्षारोपण करणे यासह इतर शासकीय योजना राबविण्यावर



भर देण्यात येत आहे. जिल्ह्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना आयएसओ करण्यासाठी व्हि. एन.टेक्नो. रिसर्च प्रा.लि. कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. डॉ. भरत बास्टेवाड यांनी तांबाटी ग्रामपंचायतींला नुकताच माझी वसुंधरा अंतर्गत पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, विस्तार अधिकारी महेश घबाडी, ग्रामपंचायत सदस्य नितीन कदम, विकास जाधव व सुखदेव चव्हाण उपस्थित होते. ग्रामपंचायतीला आय. एस.ओ. मानांकन मिळण्यासाठी ग्रामपंचायत सरपंच अविनाश आमले, उपसरपंच शितल पाटील यांनी मेहनत घेतली.

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता**, कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**